# स्त्रीमुक्ती आंदोलनापुढील अग्रक्रमाच्या समस्या

८ मार्च १९०८ ! न्यूयार्कमध्ये कपडे तयार करणाऱ्या कारखान्यातील स्त्रियांनी प्रचंड निदर्शने केली. या स्त्रियांना कोंदट जागेत १२–१२ तास काम करावे लागे. कामाचे तास कमी करण्याची व मतदानाच्या हक्काची मागणी करत या स्त्रिया रस्त्यावर आल्या. देशोदेशांतील स्त्रियांना न्यूयार्कमधील ८ मार्चची निदर्शने स्फूर्तिदायक ठरली.

दोन वर्षांनी कोपनहेगन (डेन्मार्क) येथे अनेक देशातील स्त्रियांची एक परिषद भरली. तिथे एक सूचना मांडली गेली की ८ मार्चला आता लढाऊ संदर्भ मिळाला आहे तेव्हा तो आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून पाळण्यात यावा. जर्मनीच्या स्त्रीमुक्ती चळवळीतील कार्यकर्ती क्लारा झेटकीन हिने ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून प्रस्थापित करण्यात पुढाकार घेतला.

स्त्री मुक्ती आंदोलनाचे स्वरूप, चळवळीपुढील महत्वाच्या समस्या याविषयी सखोल चर्चा व प्रयत्न त्यानंतरच्या काळात झाले. क्लारा झेटकिन हिची ह्या संदर्भात लेनिन बरोबर झालेली चर्चा स्त्रीमुक्ती चळवळीच्या संदर्भात महत्वाची आहे. त्यातील 'लैंगिक जीवनाच्या समस्या व समाजवादी चळवळ' यासंदर्भातील चर्चा क्लारा झेटकिनच्या शब्दात वाचा :

---

**चर्चेमध्ये** लेनिनने प्रश्न उपस्थित केला, 'कामकरी महिलांबरोबर वाचण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी ज्या संध्याकाळच्या बैठका भरवल्या जातात, यांच्यात प्रथम लैंगिक आणि वैवाहिक समस्यांवर चर्चा घडतात असे मला सांगण्यात आले आहे. तुमच्या राजकीय शिक्षणात आणि शैक्षणिक कार्यात या विषयांना सर्वात जास्त प्राधान्य देण्यात येते म्हणे ! मी जेव्हा हे ऐकले तेव्हा माझ्या कानांवर माझा प्रथम विश्वासच बसेना. कामगारवर्गीय अधिसत्तेचा पहिला देश संबंध जगभरच्या प्रतिक्रांतिकारांविरुद्ध लढतो आहे. जर्मनीतील सध्याची परिस्थिती अशी आहे की, सध्या पुढे रेटून येणाऱ्या प्रतिक्रांतीला परतवून लावण्यासाठी सर्व कामगारवर्गीय क्रांतिकारक शक्तींची मोठ्यात मोठी एकी होणे आवश्यक आहे. पण क्रियाशील कम्युनिस्ट महिला कालच्या, आजच्या आणि उद्याच्या लैंगिक समस्यांवर आणि विवाहाच्या प्रकारांवर चर्चा करण्यात गुंतल्या आहेत. या प्रश्नांवर कामकरी महिलांचे प्रबोधन करणे हे आपले सर्वांत महत्त्वाचे कार्य आहे, अशी त्यांची समजूत झाली आहे....

हिंदुस्थानी योगी जसा आपल्या नाभीच्या ध्यानात गढून जातो, त्याप्रमाणे सदैव लैंगिक समस्यांमध्ये डुंबून राहिलेल्या लोकांवर माझा विश्वास नाही. मला असे वाटते की, या लैंगिक विचारप्रणालींचे भरघोस पीक वैयक्तिक गरजेपायी निर्माण होते....'

मी मध्येच म्हणाले की, 'जेथे खाजगी मालमत्ता आणि भांडवलदारी समाजपद्धतीचे वर्चस्व असते, तेथे सर्व सामाजिक वर्गांच्या आणि स्तरांच्या महिलांना लैंगिक व वैवाहिक प्रश्नांमधून निर्माण होणाऱ्या विविधांगी समस्यांना, संघर्षांना आणि यातनांना तोंड द्यावे लागते. महिलांच्या बाबतीत बोलायचे तर, युद्धामुळे आणि त्याच्या परिणामांमुळे नेमक्या लैंगिक संबंधाच्या क्षेत्रात अस्तित्वात असलेले संघर्ष आणि यातना पराकोटीला पोहोचल्या आहेत. महिलांपासून पूर्वी लपवून ठेवलेल्या समस्या आता उघडचावर मांडण्यात आल्या. त्यात क्रांतीच्या आरंभीच्या वातावरणाची भर पडली. जुन्या भावनांच्या आणि विचारांच्या जगाला तडे जात होते. पूर्वीचे सामाजिक संबंध शिथिल होत होते आणि तुटत होते. लोकांमधील नव्या नात्यांचा उदय होत होता. संबंधित समस्येबाबतचे स्वारस्य म्हणजे प्रबोधनाच्या आणि नव्या दिशेचा स्वीकार करण्याच्या गरजेची अभिव्यक्ती होती. तसेच भांडवलदारी समाजाच्या विपर्यासांविरुद्ध व ढोंगाविरुद्ध ती प्रतिक्रिया होती. इतिहासाच्या क्रमात विवाहाच्या आणि कुटुंबाच्या प्रकारांमध्ये जे बदल घडत आले त्यासंबंधी

तसेच अर्थव्यवस्थेवरील त्यांच्या अवलंबित्वाविषयी, कामकरी महिलांना माहिती करून दिली तर भांडवलदारी समाजाच्या अमरत्वाविषयीच्या त्यांच्या पूर्वगृहीत विचारांपासून त्यांची सुटका होईल. याबाबतीत टीकात्मक ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अवलंब करून भांडवलदारी समाजाचे अत्यंत कठोरपणे विश्लेषण केले पाहिजे, त्या समाजाच्या मूलतत्त्वाचे व त्याच्या परिणामांचे खरे स्वरूप उघडकीला आणले पाहिजे, तसेच लैंगिक नीतिमत्तेचे खोटेपण उघडे केले पाहिजे सामाजिक परिस्थितीचे खरेखुरे मार्क्सवादी विश्लेषण, अपरिहार्यपणे भांडवलदारी समाजाच्या आणि त्याच्या पायाच्या, खाजगी मालमत्तेच्या विश्लेषणाकडे घेऊन गेले पाहिजे.'

लेनिन यांनी स्मित करून मान डोलावली,

'एखाद्या वकीलाप्रमाणे तुम्ही तुमच्या कॉम्रेडांचे आणि पक्षाचे समर्थन करता आहात ! अर्थात तुम्ही जे बोलता आहात ते खरे आहे पण जर्मनीत जी चूक घडली त्याची ती फार तर सबब ठरेल. मात्र ते समर्थन होणार नाही. शेवटी ती चूकीच रहाते. वाचनांच्या आणि चर्चांच्या त्या सायंकालीन कार्यक्रमांमध्ये लैंगिक आणि वैवाहिक प्रश्नांवर परिपक्व, महत्त्वांच्या ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टिकोनांतून परामर्श घेण्यात आला, अशी तुम्ही प्रामाणिकपणे माझी खात्री पटवू शकाल का ? ... या समस्येकडे अयोग्य आणि अमार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहिले जाते याचा परिणाम काय ? परिणाम असा आहे की, लैंगिक आणि वैवाहिक समस्यांकडे मुख्य सामाजिक समस्येचा केवळ एक भाग म्हणून पाहिले जात नाही. याउलट मुख्य सामाजिक समस्येला लैंगिक समस्येचा एक भाग म्हणून सादर केले जाते. महत्त्वाचा मुद्दा मागे पडतो. अशा प्रकारे केवळ हा प्रश्नच अस्पष्ट होत नाही तर विचारही संदिग्ध बनतो व कामकरी महिलांची एकूण वर्गजाणीव मंदावते.

'शिवाय प्रत्येक गोष्टींची एक सुयोग्य वेळ असते हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. मी तुम्हाला विचारतो, प्रेम कसे करावे किंवा करून घ्यावे, प्रणयाराधन कसे करावे किंवा करवून घ्यावे, अशा प्रश्नांवर महिनेच्या महिने कामकरी महिलांना गुंतवून ठेवण्याची ही वेळ आहे का ? अर्थात याचा परामर्श 'भूत, वर्तमान आणि भविष्य' काळ लक्षात घेऊन व विविध वंशामधील काळांचा विचार करून. यालाच अभिमानाने ऐतिहासिक भौतिकवाद म्हटले जाते ! पण सध्याच्या दिवसात कामकरी महिलांचे सर्व विचार कामगारवर्गीय क्रांतीभोवती एकवटले पाहिजेत. ही क्रांती इतर गोष्टीबरोबर विवाहांच्या आणि लैंगिक नात्यांच्या सुधारणेचा पाया घालील. ऑस्ट्रेलियातील वन्य जमातींमध्ये कोणते विवाहप्रकार प्रचलित आहेत, अथवा प्राचीन काळात भाऊ–बहिणीचा विवाह कसा होत होता, अशा समस्यांचा सध्या विचार न करता इतर समस्यांना आपण खरोखरच प्राधान्य दिले पाहिजे. जर्मन कामगारवर्गाच्या दृष्टीने सोविएतांची समस्या, व्हर्सायच्या तहाची समस्या आणि त्या तहाचा महिलांच्या जीवनावर घडलेला परिणाम, बेकारीची समस्या, खाली घसरणाऱ्या वेतनांची समस्या, करांची समस्या व इतर अनेक गोष्टी आजच्या घडीला अत्यंत महत्त्वाच्या आहेत. थोडक्यात सांगायचे तर कामकरी महिलांना अशा प्रकारचे राजकीय आणि सामाजिक शिक्षण देणे चुकीचे आहे, अगदी साफ चुकीचे आहे असे अजूनही माझे मत आहे,...

● तुमच्या युवक संघटनांमध्येसुद्धा लैंगिक समस्या हा मोठा आवडता विषय आहे आणि या विषयावर बोलायला पुरेसे व्याख्याते तेथे सापडत नाहीत, असेही मला सांगण्यात आले. हे युवक–चळवळीला विशेष धोकादायी आणि अपायकारक आहे. त्यामुळे लैंगिक अतिरेक घडण्याची, लैंगिक जीवनाला अतिरेकी उत्तेजन मिळण्याची व युवकांच्या आरोग्याची आणि ताकदीची नुकसानी घडण्याची फार मोठी शक्यता आहे. याविरुद्धही तुम्ही लढले पाहिजे. युवक–चळवळ आणि महिलांची चळवळ यांच्यात सतत संपर्क आहे. आमच्या कम्युनिस्ट महिलांनी सर्वत्र युवकांशी पद्धतशीर सहकार्य केले पाहिजे. असे करणे मातृत्वाची परंपरा चालविण्यासारखे ठरेल, मातृत्वाला वरच्या पातळीवर नेले जाईल आणि वैयक्तिक क्षेत्रापासून सामाजिक क्षेत्रापर्यंत त्याचा विस्तार होईल. महिलांच्या प्राथमिक व सामाजिक जीवनाला आणि कार्यांना चालना दिली पाहिजे. घर आणि कुटुंब यांच्याभोवती पिंगा घालण्याचा आपल्या एकांगी मनोवृत्तीच्या संकुचितेतून, त्या बाहेर पडतील.

'आमच्या देशातसुद्धा अनेक तरुण माणसे लैंगिक प्रश्नातील 'भांडवलदारी संकल्पना आणि नीतितत्वे सुधारण्याचा' प्रयत्न करण्यात गुंतली आहेत. आणि मला हेही सांगितले पाहिजे की आमची काही सर्वोत्तम मुले आणि मुली, ज्यांच्यात काही खरोखरीच अपेक्षा धरावी असे आमचे युवक, त्यात गुंतले आहेत. आता तुम्ही म्हणलेत त्याचप्रमाणे परिस्थिती आहे. युद्धानंतरच्या परिणामांनी निर्माण झालेल्या आणि सुरू झालेल्या क्रांतीने निर्माण केलेल्या वातावरणामध्ये, ज्या समाजाच्या आर्थिक अधिष्ठानामध्ये मोठे अकस्मात बदल घडत आहेत, अशा समाजात जुनी सैद्धांतिक मूल्ये नष्ट होतात आणि त्यांची पकडशक्ती ढिली पडते. अशी मूल्ये लढयामधून हळूहळू आकाराला येतात. लोकालोकांमधील संबंधात आणि स्त्री-पुरुषांमधील संबंधातसुद्धा, भावना आणि विचार यांच्यात, क्रांती घडून येत आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या हक्कादरम्यान नव्या सीमारेषा आखल्या जात आहेत. त्यामळे व्यक्तीची कर्तव्येसुद्धा नव्याने ठरविली जात आहेत. अवघड घटस्फोट, नवऱ्याला मुक्तता आणि बायकोला बंधन, खोटी लैंगिक नीतिमत्ता व नाती यांचा समावेश असलेल्या भांडवलदारी विवाहाचा ऱ्हास, यांच्यामुळे क्रियाशील लोकांचा जीव तिरस्काराने उबून जातो.

भांडवलदारी विवाहाच्या जुलुमामुळे आणि कुटुंबविषयक भांडवलदारी कायद्यांमुळे अनिष्ट प्रवृत्ती वाढतात आणि संघर्ष तीव्र होतात. 'पवित्र' मालमत्तेचा हा जुलूम आहे. बुद्धीच्या दुरुपयोगाला, नीचतेला, ती पवित्र बनविते. 'समान्य' भांडवलदारी समाजात परंपरागत ढोंगीपणा बाकीच्या गोष्टींची काळजी वाहतो. प्रस्थापित द्वेषांविरुद्ध आणि विकृतींविरुद्ध लोक बंड करतात. आणि जेव्हा बलाढ्य राष्ट्रांचा नाश होत असतो, जेव्हा पूर्वीची सत्तेची नाती तोडली जात असतात, जेव्हा संबंध सामाजिक जगाचा ऱ्हास सुरू होतो, अशा काळात व्यक्तींच्या संवेदनाशक्तींमध्ये वेगाने बदल घडत असतात. चैनीच्या विविध प्रकारांची उत्तेजक तहान भागविण्याच्या इच्छा विलक्षण प्रबळ बनतात. भांडवलदारी अर्थाने लैंगिक आणि वैवाहिक क्षेत्रामध्ये कामगारवर्गीय क्रांतीशी सुसंवादी अशी एक क्रांती जवळ येत आहे. अर्थात यांच्या परिणामी निर्माण झालेल्या समस्यांच्या गुंतागुंतीच्या तिढ्यांत महिला आणि युवक मंडळी फार रस घेत आहेत त्यामुळे सध्याच्या लैंगिक संबंधांच्या गोंधळाच्या परिस्थितीत महिलांचे आणि युवकांचे असे दोघांचेही अतोनात नुकसान होत आहे. तरुण मंडळी आपल्या वयाला अनुसरून पोटतिडकीने त्याच्याविरुद्ध बंड करतात. हे अगदी स्वाभाविक आहे. मठातील संयमी वृत्ती पाळण्याचा आणि बेगडया भांडवलदारी नीतिमूल्यांची पवित्रता पाळण्याचा तरुणांना उपदेश करणे, यासारखा दुसरा खोटेपणा नाही. तरीही, एव्हांना शरीरिक अर्थानेही जोरदारपणे जाणवणाऱ्या लैंगिक विषयाला या अशा काळात तरुणांच्या विचारांमध्ये एवढे मोठे महत्त्व मिळावे ही मुळीच चांगली गोष्ट नाही. त्याने परिणाम फार घातक होतील.

तरुणांचा लैंगिक प्रश्नांबाबतचा बदललेला दृष्टिकोन अर्थातच 'मूलभूत' आहे आणि विचारप्रणालीवर आधारलेला आहे. अनेक लोक तिला 'क्रांतिकारक' किंवा 'कम्युनिस्ट' म्हणतात. हे असेच आहे असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. पण तरुणांचे – आणि अनेकदा प्रौढांचेही –– हे तथाकथित 'नवे लैंगिक जीवन' चक्क भांडवलदारी छापाचे आहे, जुन्या भांडवलदारी कुंटणखान्याची केवळ ही नवी आवृत्ती आहे असे मला वारंवार वाटते. आम्हा कम्युनिस्टांची मुक्त प्रेमाची जी काही कल्पना आहे तिच्यात आणि या सर्व गोष्टींमध्ये काडीमात्र साधर्म्य नाही. कम्युनिस्ट समाजात लैंगिक इच्छा तृप्त करणे आणि प्रेमाची आस पुरी करणे हे 'पाण्याचा ग्लास पिण्याइतके' सोपे आणि क्षुल्लक आहे, हा प्रसिद्ध सिद्धांत तुम्ही ऐकला असेल यात काही शंका नाही. आमच्या तरुणांचा एक विभाग या 'पाण्याच्या ग्लासाच्या सिद्धांतापायी' अगदी वेडापिसा बनला आहे. अनेक युवक–युवतींचा त्यामुळे घात झाला आहे. या सिद्धांताचे अनुयायी आग्रहपूर्वक प्रतिपादन करतात की हा मार्क्सवादी सिद्धांत आहे.

माझ्या मते 'पाण्याच्या ग्लासाचा' सिद्धांत पूर्णतया अ–मार्क्सवादी आहे, एवढेच नव्हे तर समाजविरोधी आहे. लैंगिक जीवनात फक्त निसर्गाने काय दिले आहे याचाच विचार करावयाचा नसतो. तर उच्च

किंवा खालच्या पातळीवरच्या संस्कृतीचाही विचार करावा लागतो. 'कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता आणि राज्य यांचा उगम' या आपल्या पुस्तकात एंगल्स यांनी दाखवून दिले होते की सामायिक लैंगिक संबंधाचे पुढे वैयक्तिक लैंगिक प्रेमात रूपांतर होत गेले आणि अशा रीतीने ते प्रेम अधिक विशुद्ध बनले... तहान भागवली पाहिजे हे खरे. म्हणून काय सर्व-सामान्य माणूस गटारात आडवा पडेल आणि डबक्यातले घाण पाणी पिईल? पण इतर कशाहीपेक्षा सामाजिक अंग जास्त महत्त्वाचे आहे. पाणी पिणे ही खरोखरीच वैयक्तिक बाब आहे. पण लैंगिक प्रेमासाठी दोन व्यक्ती असाव्या लागतात आणि त्यांच्या संयोगातून तिसरी व्यक्ती, एक नवे जीवन, अस्तित्वात येण्याची शक्यता असते. या कृत्याला सामाजिक स्वरूप आहे आणि समाजाप्रत कर्तव्य त्यात अंतर्भूत आहे.

एक कम्युनिस्ट या नात्याने 'पाण्याच्या ग्लासाच्या' सिद्धांत मला अजिबात आवडत नाही. 'प्रेमाचे विमोचन' असे मोठे आकर्षक बिरुद त्या सिद्धांताला चिकटवले असले तरी! शिवाय प्रेमाचे विमोचन ही काही नवी कल्पना नाही किंवा कम्युनिस्ट कल्पनाही नाही. गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास 'हृदयाचे विमोचन' म्हणून ही कल्पना ललित साहित्यातून पुढे मांडण्यात आली होती, असे तुम्हाला आढळून येईल. पण भांडवलदारी व्यवहारात तिचे लैंगिक विमोचनात रूपांतर घडले. आत्तापेक्षा अधिक हुशारीने त्याचा पुरस्कार करण्यात येई, पण हे विमोचन व्यवहारात कशा प्रकारे अंमलात आणले जाई, याची काही मला कल्पना करता येत नाही.

'माझ्या टीकेतून विरक्तवादाची जोपासना करण्याचा माझा मुळीच उद्देश नाही. माझे विचार अशा उद्देशाहून फार वेगळे आहेत. कम्युनिझमने विरक्तवाद आणू नये, तर फलद्रूप प्रेमजीवनामधून निर्माण होणारा आनंद आणि शक्ती आणावी, इतर चांगल्या गोष्टी आणाव्या. उलट लैंगिक जीवनाला आलेल्या अतिरेकामधून ना आनंद लाभतो ना सामर्थ्य मिळते. उलट त्यांची हानी होते असे मला वाटते. क्रांतीच्या युगात हे फार वाईट घडते आहे.

युवकांना आनंदाची आणि सामर्थ्याची विशेष गरज असते. कसरती, पोहणे, सर्व प्रकारचे शारीरिक व्यायाम यांसारख्या खेळांची व बौद्धिक क्षेत्रातील विस्तृत ज्ञान घेण्याची त्यांना गरज आहे. तसेच अध्ययनाची, अभ्यासाची व संशोधनाची त्यांना गरज आहे. आणि या गोष्टी शक्यतो त्यांनी सामुदायिकरीत्या केल्या पाहिजेत. लैंगिक समस्यांवर व तथाकथित मनमुक्त जगण्यावर अखंड भाषणे देण्यापेक्षा आणि चर्चा करण्यापेक्षा युवकांना हे जास्त उपयुक्त ठरले. अगदी विरक्त योगी बनू नका किंवा केवळ भोगीही बनू नका, पण त्याचबरोबर या दोन्हींच्या दरम्यान 'जर्मन क्षुद्रवृत्ती' माणसासारखे बनू नका. राजकीय लढ्याच्या दृष्टीने आणि क्रांतीच्या दृष्टीने हे चांगले नाही. ज्या स्त्रियांचे प्रेमप्रकरण राजकारणाशी गुरफटलेले आहे अशा स्त्रियांचे खात्रीशीरपणावर किंवा सहशीतेलतेवर माझा विश्वास नाही. तसेच प्रत्येक तरुणी मागे धावणाऱ्या पुरुषाचीही मला खात्री वाटत नाही. क्रांतीशी हे अजिबात सुसंगत नाही.

जनसमूहांनी आणि व्यक्तींनी आपले विचार केंद्रित करण्याची, नस-न्-नस एकवटण्याची क्रांती-साठी जरुरी असते. लैंगिक बाबतींत स्वैरता असणे हा भांडवलदारी विशेष आहे. ही अधःपाताची खूण आहे. कामगारवर्ग हा उदयमान वर्ग आहे. त्याला धुंद करण्यासाठी किंवा उत्तेजक बनविण्यासाठी कोण-त्याही मादक पदार्थांची गरज नाही. तसेच लैंगिक शिथिलतेच्या किंवा मद्याच्या अमलाचीही गरज नाही. भांडवलशाहीचा दुष्टपणा, आणि जंगलीपणा त्याने विसरू नये व तसा तो विसारणारही नाही. आपल्या वर्गीय स्थानामधून, कम्युनिस्ट ध्येयामधून, तो लढण्यासाठी सर्वात जोरदार स्फूर्ती मिळवितो. त्याला केवळ स्पष्टपणाची गरज आहे; दुसऱ्या–तिसऱ्या कशा-चीही गरज नाही तर फक्त स्पष्टपणाची गरज आहे. म्हणूत मी पुन्हा एकवार सांगतो की, शक्ती क्षीण करून चालणार नाही, वाया घालवून चालणार नाही, तिची नासाडी करून चालणार नाही. आत्मसंयमन आणि स्वयंशिस्त म्हणणे गुलामी नव्हे. प्रेमाच्या बाबतीतसुद्धा असे वागणे म्हणजे गुलामी नव्हे.'